**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**माहिती व जनसंपर्क विभाग**

**प्रेसनोट**

- **जागतिक महिला दिनानिमित्त मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन सेवेचा स्तुत्य उपक्रम**
- **जागतिक महिला दिनानिमित्त स्त्रीत्वाचा सन्मानार्थ मोफत परिवहन सेवेचा एकूण 22 हजार 131 महिलांनी घेतला लाभ**

जागतिक महिला दिनानिमीत्त 8 मार्च रोजी  स्त्रीत्वाचा सन्मानार्थ मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन सेवेच्या बसमध्ये दिवसभर मोफत प्रवासाची सुविधा दिली जाते. दिनांक 8 मार्च 2024 रोजी आयुक्त तथा प्रशासक श्री. संजय श्रीपतराव काटकर यांच्या निर्देशानुसार व अतिरिक्त आयुक्त अनिकेत मानोरकर यांच्या मार्गदर्शनाखाली जागतिक महिला दिनानिमित्त स्त्रीत्वाचा सन्मानार्थ परिवहन मोफत सुविधेचा 22,131 महिला प्रवाशांनी लाभ घेतला. नागरिकांनी जास्तीत जास्त परिवहन उपक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक श्री.श्री. संजय श्रीपतराव काटकर  यांच्या वतीने करण्यात येत आहे.